**नि.दिवाणी दावा क्रं.५९/२००९**

**नि. क्रं.१२१**

:: **वादी करिता उलटतपास अधिवक्ता श्री. व्ही.एन. संकाये यांच्यामार्फत ::**

०१. माझे शिक्षण इयत्ता ३ री पर्यंत गुरधाळ येथे झाले. गुरधाळ येथे शाळा इयत्ता ७ वी पर्यंत आहे. ती मागील ६० ते ६५ वर्षापासून आहे. माझा जन्म १९४२ साली झाला. माझे ३ री चे शिक्षण कोणत्या वर्षी झाले हे मला माहीत नाही. नारायणला १ मुलगा म्हणजे मी आणि ५ मुली आहेत. माझ्या बहिणीची नावे काशिबाई, रत्नाबाई, परमाबाई, कौशाबाई व रुक्मिनबाई ही आहेत. मला एक बायको, दोन मुलं व एक मुलगी आहेत. माझ्या पत्नीचे नाव लोचनबाई आहे. त्या हयात नाहीत. माझ्या पत्नीच्या मृत्यूनंतर फूल चढविण्याचा कार्यक्रम होता. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याच्या पत्रिका छापल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, फूल चढविण्याचा कार्यक्रम दि.३१/१२/२०१८ रोजी होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या आदल्या दिवशी कीर्तनाचा कार्यक्रम केला. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर फूल चढविण्याच्या कार्यक्रमाला तुकाराम गट्टे यांना पत्रिका दिली होती.

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांना नागोबा म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, नागोबाला पांडुरंग हा मुलगा होता. हे म्हणणे खरे आहे की, नागोबाला नारायण व मलबा हे मुले होती. हे म्हणणे खरे नाही की, नागोबाला दोन मुली म्हणजे मला दोन आत्या होत्या. माझ्या जन्माच्या पूर्वी नागोबाचा मृत्यू झाला होता. माझे वडील नारायणचा मृत्यू वर्ष १९८५ मध्ये झाला.

प्रश्न – पांडुरंगचा मृत्यू केव्हा झाला ?

उत्तर – पांडुरंग माझा चुलता नव्हताच.

०३. वर्ष १९९६ मध्ये मलबाचा मृत्यू झाला. नारायण आणि

मलबाच्या मृत्यूची ग्रामपंचायतला नोंद आहे. माझ्या मुलीला बोरसुरी येथील तुकाराम खोल्ले यांच्या घरी दिलेले आहे.

प्रश्न – तुमच्या मुलीला वादी शकुंतलाच्या गावात दिलेले आहे ?

उत्तर – त्याचा काहीही संबंध नाही.

प्रश्न – वादी ही पांडुरंगची मुलगी आहे ?

उत्तर – पांडुरंग माझा चुलताच नाही.

प्रश्न – पांडुरंगच्या मृत्युनंतर त्याची पत्नी इंदराबाईचे लग्न चांदुरवाडी येथील व्यंजने यांच्यासोबत झाले होते ?

उत्तर – पांडुरंग माझा चुलता नाही.

प्रश्न – तुमचे वडील आणि चुलते मलबा यांनी इंदराबाईचे लग्न लावून दिले होते ?

उत्तर – पांडुरंग माझा चुलताच नाही.

०४. हे म्हणणे खरे नाही की, वादी शकुंतला ही कधी गुरधाळ तर कधी चांदुरवाडी येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी शकुंतलाचा मुलगा महादेव आणि मुलगी केशर यांच्या लग्नाला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, शकुंतला आणि त्यांच्या मुलाचे आमच्याकडे येणेजाणे होते.

०५. माझ्या वडिलांनी सर्वे नं.२६ मधील २४ एकर २९ गुंठे जमीन खरेदी घेतलेली आहे. नागोबाच्या नावे कोणतीही जमीन नव्हती. माझे वडील वारल्यानंतर वारस हक्काने सदर जमीन माझ्या नावे झाली. त्यावेळी माझे चुलते मलबा आणि माझ्या बहिणी रुक्मीण आणि कौशल्या यांची नावे आणि माझे नाव सामाईकामध्ये नोंदविले होते. मी सदर जमीन वाटून घेतलेली नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदर जमीन माझ्याच नावावर आहे. मी तहसील कार्यालयामध्ये वाटणीपत्र करून सदर जमीन माझी मुले अंकूश

आणि आशोक म्हणजे प्रतिवादी क्र.२ व ३ यांना दिले. सदर वाटणीपत्र वर्ष १९९१ मध्ये केले. अशोकने आणि अंकुशने त्यांच्या हिस्स्याची वाटणी केलेली नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/०८/२००४ रोजी मी दाव्यामध्ये लेखी जबाब दाखल केला होता. आता मला अर्ज नि.२८ सोबत दाखल लेखी जबाब दाखविला. त्यावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जासोबत अंकुश व्यंकटराव वलसे यांनी लेखी जबाबाचे शपथपत्र दाखल केले होते. आता मला शपथपत्र दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर अंकुशची सही आहे.

०७. माझे गावातील लोकांसोबत चांगले संबंध आहेत. बाबाराव दशरथ धनासुरे, किसन आप्पाराव पाटील, नामदेव जेठुरे, गोविंद पेटे आणि किसन संभाजी घोगरे हे माझ्या गावातील व्यक्ती आहेत. ते आजरोजी हयात नाहीत. अंगद शिंगडे, रावसाहेब निडवंचे आणि पुंडलीक जेठुरे हे माझ्या गावातील व्यक्ती आहेत. ते आजरोजी हयात आहेत.

प्रश्न – सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांनी शकुंतला ही पांडुरंगची वारस आहे म्हणून प्रमाणपत्र दिले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे ?

उत्तर – पैसे घेऊन लोक काहीही करतात. त्यामुळे त्यांनी प्रमाणपत्र दिलेले असेल.

०८. शकुंतलाने खोट्या कागदपत्राच्या आधारे दावा केल्याबाबत मी पोलिसांत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला वर्ष १९९८ मध्ये वाटणी मागितली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर बेकायदेशीररित्या वारसांच्या नावे नोंद करून घेतली.

प्रश्न – पांडुरंगचा नागोबाच्या जमिनीमध्ये १/३ हिस्सा होता ?

उत्तर – पांडुरंग माझा चुलताच नव्हता.

०९. हे म्हणणे खरे नाही की, मलबाला मूलबाळ नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मलबाच्या हिस्स्यामध्ये शकुंतलाचा अर्धा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझ्या आजोबांना वडिलांकडून मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला अधिकार नसताना मी जमीन बेकायदेशीररित्या विकली. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशीररित्या वाटणी करून घेतली व वाटणी करून दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी लेखी जबाबामध्ये खोटी माहिती दिली आणि खोटे साक्ष शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.१३/०३/२०२६.